


## पाऊसवेळ

आलं आलं, आभाळ भरून
मेघांच्या पिसारी धरून
अंगी काजळ कालवून
कृष्ण रसात मोहून ॥ १ ॥

थेंब थेंब, नभास सोडून
वाऱ्यावरी नाचून घुमून
रानात, पंखात शिरून
झाड वेलींना पांघरून ॥ २ ॥

कण कण, मातीचा भिजून
ओलेत्या गारव्या बिलगून
नाद, सूर छेडून
गंध शिंपतो दिशातून ॥ ३ ॥

© सचिन पु. कुलकर्णी
www.saarthbodh.com
FB ID - sachin.kulkarni78